आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ करीता समाज मंदीराचे बांधकाम (टिएसपी) लेखाशीर्ष (४२२५ ११५४) या अंतर्गत निधी वितरण आदेश..

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०२३/ प्र.क्र. ११२ /कार्यासन.६
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०४ ऑगस्ट ,२०२३.

वाचा

१) शासन परिपत्रक वित्त विभाग,क्र.अर्थस-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३ दि.१२.०४.२०२३.
२) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम(आदिवासी) मंडळ,नागपुर यांचा निधी मागणी प्रस्ताव दि.२२.०६.२०२३.

प्रस्तावना -

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ या वर्षाकरीता मागणी क्रमांक टी-६ मुख्य लेखाशिर्ष ४२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च, ०२ अनुसूचित जमातीचे कल्याण, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, (०१) (२०) समाज मंदीराचे बांधकाम (टिएसपी) (४२२५ ११५४), ५३-मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखाली रु.५०००.०० लाख इतकी तरतुद अर्थसंकल्पीत आहे. आता वित्त विभागाने अर्थसंकल्पीत तरतुदीच्या २० टक्के मर्यादेत निधी उपलब्ध करुन दिला आहे. सदर लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पीय अंदाज वितरण प्रणालीवर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र.टी-६ मधील समाज मंदीराचे बांधकाम (टिएसपी) (४२२५ ११५४), ५३- मोठी बांधकामे या अंतर्गत सन २०२३-२४ या वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी **रु. ९.०० लाख (अक्षरी रुपये नऊ लाख फक्त)** इतका निधी खालीलप्रमाणे नियंत्रक अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपुर यांना वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(रु. लाखात)

अ.क्र	नियंत्रक अधिकारी	कामांची संख्या	सदर शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यात येत असलेला निधी
१	२	३	४
१	अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम(आदिवासी) मंडळ,नागपुर.	१	९.००
एकुण		**१**	**९.००**

२. सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (BEAMS)वर वितरीत करण्यात येत असुन सदर निधी सोबत जोडलेल्या विवरणपत्रात नमुद केल्यानुसार एकूण **१ कामांवर** रकाना ४ मध्ये नमुद केलेल्या मर्यादेत खर्च करण्यात यावा.

३. सदर निधीचे वितरण खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१) संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी अर्थसंकल्पीय प्रकाशन परिशिष्ट -ड मध्ये समाविष्ट असलेल्या कामांवरच खर्च करण्याबाबत तसेच प्रशासकीय मान्यतेच्या/सुधारित प्रशासकीय मर्यादेतच खर्च करण्याबाबत दक्षता घ्यावी.

२) सोबतच्या विवरणपत्रात नमुद केलेल्या १ कामांवरच सदरील निधी खर्च होईल याची दक्षता संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी.

३) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, **नागपुर** यांचे मार्फत सदर बांधकामांना वेळोवेळी भेटी देण्यात येवून कामाचा दर्जा, गुणवत्ता यांची तपासणी करावी व वितरीत करण्यात आलेला निधी योग्य रित्या खर्च होत आहे याची दक्षता घ्यावी.

४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग अमरावती यांनी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ यांचे मार्फत सादर केलेल्या मागणीस अनुसरुन निधी वितरीत करण्यात येत असुन सदर निधी तात्काळ खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

५) सदर वितरीत निधीमधुन झालेल्या खर्चाचा अहवाल नियंत्रक अधिकारी यांनी एकत्रित करुन तो विहित प्रपत्रात शासनास सादर करावा.

६) वित्त विभागाच्या वेळोवेळी निर्गमित शासन परिपत्रकामधील विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकारी यांची राहील.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थस-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३ दि.१२.०४.२०२३ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०८०४१८४८५६२८२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA DEVARAM BHAWARI

Digitally signed by RAJENDRA DEVARAM BHAWARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=e2f5429d49742f96b79e4293421ba2dfa8a71cad3864b9b289879d173b67fcdc, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F617DED8E7182679ED107E63511160B2054D23D8173AD985E5B569A5802CEA5A, cn=RAJENDRA DEVARAM BHAWARI
Date: 2023.08.07 13:15:32 +05'30'

(राजेंद्र दे. भवारी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, आदिवासी विकास, यांचे खाजगी सचिव , मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव,आदिवासी विकास विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. मुख्य अभियंता, बांधकाम व्यवस्थापन कक्ष, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
६. प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र,अकोला.
७. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ,नागपुर.
८. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग,अमरावती.
९. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१०. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी,अकोला.
१३. वित्त विभाग (व्यय १४/अर्थ-१९), मंत्रालय, मुंबई-३२
१४. कार्यासन -२, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
१६.निवड नस्ती (का-६) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०२२/ प्र.क्र.११२/कार्यासन.६, दि. ०४ ऑगस्ट,२०२३ सोबतचे विवरणपत्र.			
			(रु.लाखात)
अ.क्र.	कामाचे नाव	प्रशासकीय मान्यता किंमत	उपलब्ध निधीच्या प्रमाणात वितरणाकरीता प्रस्तावित
१	२	३	४
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती			
१	मौजे चोंढी ता.पातूर जि.अकोला येथील आदिवासी संकुलाचे बांधकाम करणे	९९.९४	९.००
१	**एकूण अमरावती (आदिवासी विभाग)**	**९९.९४**	**९.००**
१	**अधिक्षक अभियंता, नागपुर (सार्व.बांधकाम आदिवासी मंडळ)**	**९९.९४**	**९.००**